# चर्चासत्र पूर्व - पहिली कार्यशाळा

२२ ऑगस्ट २००८

जोशी कला व बेडेकर वाणिज्य महाविद्यालयाच्या संस्कृत, मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषा विभागाच्या वतीने १६, १७ जानेवारी २००९ रोजी होणाऱ्या चर्चासत्राच्या निमित्ताने 'स्वातंत्र्यत्तोर काळातील भारतीय साहित्य' या विषयावर शुक्रवार दि. २२ ऑगस्ट २००८ रोजी महाविद्यालयाच्या 'कात्यायन' सभागृहात एक दिवसीय पहिली कार्यशाळा संपन्न झाली.

या कार्यशाळेचे उद्‌घाटन पेंढारकर महाविद्यालयाच्या प्राचार्या. डॉ. मंगला सिन्नरकर यांच्या शुभहस्ते झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. शकुंतला सिंह ह्या होत्या.

या कार्यशाळेचे मुख्य समन्वयक प्रा. दामोदर मोरे आपल्या प्रास्तविक भाषणात म्हणाले की, ''या कार्यशाळेला उद्‌घाटनासाठी जाणिवपूर्वक डॉ. मंगला सिन्नरकर यांना बोलावले आहे. मला सांगताना आनंद वाटतो की, आपल्या महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या माजी विद्यार्थीनी डॉ. सिन्नरकर पेंढारकर महाविद्यालयाच्या प्राचार्या झाल्या आहेत.'' असे सांगून प्रा. मोरे यांनी चर्चासत्राच्या स्वरूपाची दिशा स्पष्ट केली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांनी चर्चासत्रांची, कार्यशाळांची गरज प्रतिपादन केली.

आपल्या उद्‌घाटनपर भाषणात प्राचार्या डॉ. सिन्नरकर म्हणाल्या, ''साहित्य हा समाज जीवनाचा आरसा आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक साहित्य कृतींनी सामाजिक अभिसरण केले. स्वातंत्र्योत्तर काळातील साहित्य समजून घेताना भूतकाळ, भविष्य काळ आणि वर्तमानकाळ यांची सांगड घातली पाहिजे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर साहित्याची निर्मिती ही केवळ मुंबई - पुण्यापर्यंत मर्यादित न राहाता ती देशाच्या ग्रामीण भागातही होऊ लागली. नवे - नवे साहित्य प्रवाह निर्माण झाले. या प्रवाहांनी भारतीय साहित्य समृद्ध केले. अशा समृद्ध साहित्यावर चर्चासत्र घेण्याआधी कार्यशाळा घेणे कौतुकास्पद आहे. ही कार्यशाळा चार भाषांत आयोजित केली आहे ही गोष्ट मला विशेष आवडली.''

उद्‌घाटनानंतर या कार्यशाळेची एकूण तीन सत्रे झाली. प्रत्येक सत्राध्यक्षांनी वाचल्या गेलेल्या शोध निबंधांच्या संदर्भात मौलिक मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे वैशिष्ट्य म्हणजे कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांनी देखील शोधनिबंध वाचला.

पुढील कार्यशाळेत महाविद्यालयातील प्राध्यापक आणि त्यांच्या सोबत विद्यार्थ्यांनाही शोधनिबंध वाचनासाठी तयार केले गेले.

द्वितीय वर्ष कलाच्या कु. आरती दौंडकर या विद्यार्थीनीने सादर केलेल्या स्वागतगीताने कार्यशाळेला सुरूवात झाली. तर याच विद्यार्थीनीने सादर केलेल्या पसायदानाने या कार्यशाळेची सांगता झाली.

या कार्यशाळेचे नेटके आणि सुंदर सुत्रसंचालन प्रा. अंजली पुरंदरे आणि प्रा. नम्रता श्रीवास्तव यांनी केले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्रा. मुग्धा कुळकर्णी (संस्कृत विभाग प्रमुख) प्रा. दामोदर मोरे (मराठी विभाग प्रमुख), प्रा. अनिल ढवळे (हिंदी विभाग प्रमुख) आणि प्रा. प्रमोद खराटे (इंग्रजी विभाग प्रमुख) यांनी आणि वेगवेगळ्या समितीतील प्राध्यापकांनी प्रचंड मेहनत घेतली.

प्राचार्या डॉ.शकुंतला सिंह यांची प्रेरणा आणि मार्गदर्शन यामुळे ही कार्यशाळा यशस्वी झाली.

प्रा. दामोदर मोरे डॉ. शकुंतला सिंह

समन्वयक प्राचार्या